संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# संरक्षण विभागाच्या औषधांचा काळाबाजार

**मुंबई** आणि राज्याच्या काही भागामध्ये संरक्षण दलासाठी तयार केलेली औषधे खुल्या बाजारात विकली जात असल्याचे समोर आले आहे. संपूर्ण राज्यामध्ये किमान १० लाखाची औषधे विकली जात आहेत असा निष्कर्ष राज्याच्याच अन्न-औषध प्रशासनाने काढला आहे. याविभागाच्या अधिकाऱ्यांनी काही औषध दुकानांवर धाडी घालून खास संरक्षण विभागासाठी तयार केलेली औषधे खुल्या बाजारात आलीच कशी असा मूलभूत प्रश्न निर्माण होतो. या औषधांवर तसे विशेष लेबल लावलेले असते. परंतु या औषध विक्रेत्याने ते लेबल खोडून औषधांची सर्रासपणे विक्री केली. जवळपास २००० औषध विक्रेत्यांकडे ही औषधे व्यवस्थितपणे पोहोचतात यावरून योजनापूर्वक संरक्षण विभागाची औषधे बाहेर आणली जातात आणि राज्यातील ठराविक दुकानांमध्ये वितरण करणाऱ्यांची एक विशिष्ट साखळी असल्याचेही स्पष्ट होते. कदाचित अनेक वर्षांपासून संरक्षण विभागातल्या औषधांचा या पद्धतीने काळा बाजार चालत असावा. आतापर्यंत संरक्षण विभागातल्या काही विशिष्ट वस्तू खुल्या बाजारात उपलब्ध होत असतात. त्यामध्ये प्रामुख्याने उंच किंवा महागड्या मद्यांचा समावेश असतो. काही विशिष्ट दुकानांमधनं संरक्षण विभागाच्या या वस्तू छुप्या पद्धतीने उपलब्धही होतात परंतु आतापर्यंत औषधांबाबत असे घडले नव्हते यावेळी ते प्रथमच समोर आले आहे. यामधून दोन ठळक बाबी समोर येतात. एक म्हणजे संरक्षण विभागातला हा गैरव्यवहार बऱ्याच खुलेआमपणे चालत असला पाहिजे आणि दुसरी गोष्ट म्हणजे अत्यंत स्वस्तात मिळणारी ही औषध मोठी नफखोरी करून विकणाऱ्यांचे रॅकेट तिथे असले पाहिजे. या सगळ्या पार्श्वभूमीवर सदर औषधविक्रीची गांभीर्याने दखल घेतली पाहिजे. कारण औषधांचा काळाबाजार चालत असेल असे नाही तर या औषधांमुळे अनेकांच्या जीवाशी खेळही होऊ शकतो. कारण त्या औषधांच्या लेबलवर खाडाखोड केली जाते. तिथे संबंधित औषधांची नेमकी मुदत काय आहे याबद्दलही संभ्रम होऊ शकतो. अशी औषधे नफा कमविताना लगोलग विकली जातील याचीही काळजी हे औषध विक्रेते घेत असावेत. भ्रष्टाचार किंवा गैरकारभार करणाऱ्यांना कोणत्याच गोष्टीचे भान राहत नाही. कदाचित याप्रकरणाचे धागेदोरे बरेच वरपर्यंतही पोहोचले असण्याची शक्यता आहे.

### मुख्य सूत्रधार शोधा

गेल्या १५-२० वर्षांपासून वैद्यकीय किंवा औषध क्षेत्रामध्ये गैरप्रकारांचा अक्षरशः धिंगाणा सुरू आहे. बोगस औषधांपासून बोगस डॉक्टर्सपर्यंत किंवा औषध विक्री करणाऱ्या बोगस दुकानांपर्यंत अनेक प्रकार पाहायला मिळतात. गेल्याच आठवड्यात जोगेश्वरीच्या महापालिकेच्या ट्रामा केअर सेंटरमध्ये चुकीची शस्त्रक्रिया केल्याने चार जणांवर दृष्टी गमाविण्याची वेळ आली. तर महिनाभरापूर्वी ठाण्यामध्ये कोणताही परवाना नसताना औषधविक्री करणाऱ्या चार बोगस दुकानदारांना पकडले गेले होते. गेल्या चार वर्षांपासून गाजत असलेले बीड जिल्ह्यातील अवैध गर्भपात प्रकरण आणि त्यामध्ये अटक झालेल्या डॉक्टर दांपत्याला सुनावण्यात आलेली जन्मठेपेची शिक्षा हे सगळे ताजे प्रकार समोर आहेतच. याशिवाय डॉक्टर वेगवेगळ्या चाचण्या करणारी केंद्रे शिवाय मोठी रुग्णालये यांच्या एकमेकांच्या साट्यालोट्यातून रुग्णांची लूट केली जाते. एवढेच नव्हे तर मोठ्या रुग्णालयांमध्ये चुकीचे उपचार केले जातात. शिवाय अव्वाच्या सव्वा शुल्क आकारून रुग्णांच्या नातेवाईकांना छळण्याचेच प्रकार घडत असतात. त्याच गैरप्रकारांमध्ये भर घालणारा हा नवीन प्रकार ठरतो. आश्चर्याची गोष्ट एवढीच आहे की अनेक प्रकारची सुरक्षितता जपल्या जाणाऱ्या आणि संरक्षण विभागासाठी असा शिक्का असलेल्या औषधीना पाय फुटतात यांचा अर्थ तिथल्याही वैद्यकीय क्षेत्राला भ्रष्टाचाराच्या कर्करोगाने चांगलेच पछाडलेले दिसते. एकतर त्याठिकाणी गरजेपेक्षा जास्त औषधे खरेदी केली जात असली पाहिजेत. किंवा उलटा विचार केला तर गरज नसतानाही ज्यादा औषध खरेदी करून ती खुल्या बाजारात विकण्याचा राजरोस प्रकार सुरू असावा. म्हणूनच त्याचे धागेदोरे तपासले गेले पाहिजेत. संरक्षण विभागातच जाणीवपूर्वक ज्यादा खरेदी करण्याचा गैरव्यवहार अस्तित्वात असावा आणि दुसरे म्हणजे हा प्रकार केवळ महाराष्ट्रात नाही तर अन्य राज्यातही याच पद्धतीने सुरू असण्याची शक्यता नाकारता येत नाही. वेगवेगळे एजंट, दलाल यासाखळीमध्ये गुंतलेले असतानाच कुणीतरी मोठा सूत्रधार असल्याशिवाय या गोष्टी घडू शकत नाहीत. केवळ औषध विक्रेत्यांवर कारवाई करून थांबता येणार नाही. चौकशीची व्याप्ती वाढवावी लागेल. संरक्षण विभागाने यासाठी अधिक पुढाकार घ्यायला हवा कारण त्यांच्या औषध भांडारातूनच या औषधांना पाय फुटले असल्याने संशयाची सुई सर्वप्रथम त्यांच्यापर्यंतच जाऊन पोहोचते.

### तरतूद की फसवणूक

मुंबई हे संरक्षण विभागाच्या तीनही दलांचे एक प्रमुख केंद्र मानले जाते. विशेषतः नौदलाची याठिकाणी बरीच मोठी वसाहत आहे. दक्षिण मुंबईचा बराच मोठा भाग नौदलाच्या हद्दीत येतो. कुलाबा परिसरामध्ये तीनही दलातील रुग्णांवर उपचार करणारे मोठे रुग्णालयही आहे. राज्याच्या अनेक भागातील निवृत्त सैनिक उपचारांसाठी सैनिक याच ठिकाणी येतात. बाहेरच्या रुग्णांवर तिथे उपचार होत नाहीत. शिस्तीचा बराच मोठा अवडंबर असूनही औषधे बाहेर कशी जातात हे एक गूढच म्हणावयास हवे. पुणे, औरंगाबाद, नागपूर याठिकाणी सुद्धा संरक्षण विभागाची केंद्रे आहेत. आणि प्रत्येक ठिकाणी सुसज्ज रुग्णालयेसुद्धा पाहायला मिळतात. आता ही औषधे याच ठिकाणाहून बाहेर पडली की देशाच्या अन्य भागातून ती महाराष्ट्रात आणली गेली हेदेखील शोधले गेले पाहिजे. संरक्षण दलात नोकरीत असलेल्या सैनिकांसाठी किंवा माजी सैनिकांसाठी मोफत उपचार होतात. त्यांना कोणत्याही गोष्टीची कमतरता पडू दिली जात नाही. मुबलकता हा या रुग्णालयांमधला एक विशेष प्रकारच पाहायला मिळतो. म्हणजेच गरजेपेक्षा जास्त वस्तूंचे वितरण किंवा वाटप संरक्षण दलामध्ये होते असा त्याचा अर्थ निघतो. यावरून याप्रकारांनाही आळा घालावा लागेल. यंदाच्या अंदाजपत्रकात संरक्षण विभागासाठी आतापर्यंतची सर्वाधिक म्हणजे तीन लाख कोटींची तरतूद केली आहे. पण त्यातला पैसा जर यापद्धतीने वाया जात असेल तर ही तरतूदही एक फसवणूक ठरू शकते.